जनसंपर्क कक्ष
04 JAN 2023
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात क्रांतिज्योती सावित्रीबाईंना अभिवादन प्रसंगी उपस्थित मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

■ शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. कविता ओझा, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. कविता वड्राळे, डॉ. प्रमोद पांडव, संध्या अडसुळे, भक्ती नाळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 JAN 2023
तरूण भारत

# मराठ्यांचा स्थानिक इतिहास जागतिक पातळीवर जाणार

## डॉ. उमेश कदम : शिवाजी विद्यापीठ व भारतीय इतिहास संशोधन परिषद यांच्यात सामंजस्य करार



कोल्हापूर : सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम आणि कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. निलांबरी जगताप, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. अवनीश पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्यामुळे मराठ्यांचा स्थानिक इतिहास आता जागतिक पातळीवरही जाण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे (आयसीएचआर) सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी आज येथे केले.

नववर्षाच्या सुरुवातीलाच शिवाजी विद्यापीठ व भारतीय इतिहास संशोधन परिषद यांच्यामध्ये सोमवारी झालेल्या सामंजस्य करारावेळी ते बोलत होते. प्रारंभी डॉ. कदम, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी करारावर स्वाक्षरी केल्या. डॉ. कदम म्हणाले, शिवाजी विद्यापीठासोबत करार करीत असताना अभिमान वाटत आहे. मराठ्यांचा इतिहास हा भारताचा मूळ इतिहास आहे. हा इतिहास परकीयांनी आपल्याला सांगितला आहे. मोडी, मराठीसह विविध स्थानिक भाषांमध्ये मराठ्यांचा इतिहास दडलेला आहे. येत्या फेब्रुवारीअखेरपर्यंत स्वातंत्र्ययुद्धावर आधारीत तीन व नंतर मराठा इतिहास आणि स्थानिक स्त्रोत-साधने या अनुषंगानेही दहा व्याख्याने आयोजित केली जातील. महत्त्वाच्या मराठी ग्रंथांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यासाठी १५ लाख रुपयांची तरतूदही केली जाईल, असे कदम यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत होणारा विद्यापीठाचा हा पहिला सामंजस्य करार आहे. हा करार मराठा इतिहास जागतिक पातळीवर नेण्यासाठी कामी येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि मराठा इतिहास संशोधन केंद्र यांच्या माध्यमातून ऐतिहासिक साधने व दस्तावेज भारतीय इतिहास संशोधन परिषदेला उपलब्ध करून देण्यात येतील. यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. दत्ता मचाले आदी उपस्थित होते. शिवाय या कार्यक्रमामध्ये नवी दिल्ली आणि बेंगलोर येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सर्व सदस्य ऑनलाईन सहभागी झाले. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठातील परीक्षा वेळापत्रकानुसारच

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर विभागातील सुमारे अठरा अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंगळवारी विविध महाविद्यालये आणि अधिविभागात सुरळीतपणे पार पडल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. यापुढील सर्व परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार पार पडतील, असे जाधव यांनी स्पष्ट केले. दोन सत्रांमध्ये विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. दरम्यान, बहिष्कार घातलेल्या इतिहास, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनीही मंगळवारी परीक्षा दिल्या. गैरसमजुतीमुळे सोमवारी काही विद्यार्थ्यांनी बहिष्कार टाकला होता.

पुढारी

# विद्यापीठाच्या १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांतर्गत मंगळवारी १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांना प्रारंभ झाला आहे. मंगळवारी बीए, बीएस्सी, बीकॉम, बीसीए, एमएस्सी, बीव्होक (नर्सिंग), बीव्होक (फूड प्रोसेसिंग अँड टेक्नॉलॉजी), मास्टर ऑफ आर्टस् आदी परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्नित महाविद्यालये व अधिविभागात सुरळीतपणे पार पडल्या. यापुढील सर्व परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार पार पडतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

04 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाचे स्पष्ट निर्देश; संभ्रम न बाळगण्याचे आवाहन

# परीक्षा निर्धारित वेळापत्रकाप्रमाणेच

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना सोमवार (ता.२) पासून सुरुवात झाली. परीक्षा पुढे जाणार आहेत, अशी चर्चा सुरू झाली होती; मात्र परीक्षा निर्धारित वेळापत्रकारनुसारच होणार आहेत, असे स्पष्ट निर्देश विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने दिले आहेत. नियोजित वेळापत्रकाप्रमाणे आज १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात आल्या.



विद्यापीठातील अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी वेळापत्रकात बदल करावा, या मागणीसाठी काल परीक्षेवर बहिष्कार टाकला होता. अर्थशास्त्र विभागातील ८ ते १० विद्यार्थ्यांनीच परीक्षा दिली होती, मात्र विद्यापीठ प्रशासनाने वेळापत्रकात कोणतेही बदल केले जाणार नाहीत, असे स्पष्ट केले. त्यामुळे आज सर्व विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील सर्व परीक्षा ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणेच होणार आहेत. आज दिवसभरात बी.ए., बी.एस.सी, बी.कॉम, बी.सी.ए, एम.एस.सी, बी.व्होक नर्सिंग (सीबीसीएस), बी.व्होक सस्टेनेबल अग्रीक्लचर मॅनेजमेंट, बी.व्होक अग्रीकल्चर, बी.व्होक इन अटोमोबाईल, बी.व्होक सस्टिनेबल ॲग्रीकल्चर, बी.व्होक (कॉमर्स), बी.व्होक फूड प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी, बीव्होक प्रिंटिंग ॲंड पब्लिशिंग, बी.व्होक फूड प्रोसेसिंग ॲंड मॅनेजमेंट, बीव्होक टुरिझम ॲंड सर्व्हिस इंडस्ट्री, बी.ए.डिफेन्स स्टडीज, मास्टर ऑफ आर्टस् (सीबीसीएस) या परीक्षा झाल्या. या सर्व परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्यात आल्या.

### विधी शाखेच्या परीक्षांबाबत अनिश्चितता

▪ विधी शाखेच्या विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका बहुपर्यायी असावी आणि परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करावा, अशी मागणी केली आहे. याबाबत काही विद्यार्थी न्यायालयात गेले आहेत. या पार्श्वभूमीवर आज विद्यापीठात विधी महाविद्यालयांच्या सात प्राचार्यांची बैठक परीक्षा व मूल्यमापन विभागात झाली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर चर्चा झाली. अद्याप परीक्षा पुढे ढकलण्यावर कोणताही निर्णय झालेला नाही, मात्र विधी शाखेच्या परीक्षा वेळापत्रकावर अनिश्चिततेचे सावट आहे.

‘विद्यापीठाच्या सर्व परीक्षा निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार आणि निर्धारित परीक्षा पद्धतीप्रमाणेच होणार आहेत. यामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षेबद्दल कोणताही संभ्रम बाळगू नये.’
**- डॉ. अजितसिंह जाधव**, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

‘विद्यापीठाच्या परीक्षा निश्चित कालावधीत आणि पूर्वसूचना दिल्याप्रमाणेच होणार आहेत. परीक्षेचे स्वरूप कसे, असे याची कल्पनाही विद्यार्थ्यांना देण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये. नियमानुसार परीक्षा देऊन आपले शैक्षणिक नुकसान टाळावे.’
**- स्वागत परुळेकर**, अधिसभा सदस्य, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JAN 2023
पुण्यनगरी



भवताल

डॉ. व्ही.एन. शिंदे

# आपलं पर्यावरण...

**माणसाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र व निवारा नसून अन्न, पाणी व हवा आहेत. या तिन्ही गोष्टी निसर्ग देतो. याच निसर्ग, निसर्ग व मानावतील संबंध, पर्यावरण यावर बोलू या.. भवताल सदरात**

पर्यावरण हा शब्द आज परवलीचा झाला आहे. वर्तमानपत्रे, समाजमाध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधून पर्यावरणाविषयी वाचायला, ऐकायला मिळते. पर्यावरण वाचवायला हवे, असा सूर प्रत्येक ठिकाणी आळवला जातो. पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण झाली पाहिजे, असा प्रत्येकाचा आग्रह असतो. पर्यावरण वाचवायचे असेल तर झाडे लावायलाच हवीत, असेही अनेकांच्या तोंडून ऐकायला मिळते. त्याही पुढे २००५-०६ च्या दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने या विषयाचे महत्त्व ओळखून पदवी अभ्यासक्रमामध्ये पर्यावरण विषय सक्तीचा करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक विद्यापीठातून हा विषय शिकवला जाऊ लागला. शालेय अभ्यासक्रमातही याचा समावेश आहे.

पण प्रत्यक्ष पर्यावरण म्हणजे काय? पर्यावरण वाचवायचे म्हणजे नेमके काय करायचे? हे माहीत नसते. पर्यावरण वाचवण्यासाठी झाडे लावायलाच हवीत, पण ती कशी, याची माहिती अनेकांना नसते. वृक्षांची लागवड करताना आपण नकळत पर्यावरण बिघडवत आहोत याची जाणीव नसते. त्यातून पर्यावरण वाचवण्यासाठी झाडे लावत असताना पर्यावरणाचे प्रत्यक्षात मोठे नुकसान होत असते. अनेक जिवांची घरे उजाड केली जातात. अनेकांचा अधिवास संपवला जातो. त्यामुळे पर्यावरणाची नेमकी जाण असणे आणि आपले वर्तन पर्यावरणपूरक ठेवणे ही काळाची गरज आहे. तरच ही वसुंधरा जीवसृष्टीला टिकवू शकेल; सांभाळू शकेल.

भारतात पंचमहाभुतांना महत्त्व देण्यात आले आहे. पृथ्वी किंवा भूमी, आप किंवा पाणी, तेज किंवा अग्नी, पवन म्हणजेच वायू आणि व्योम किंवा आकाश ही ती पंचमहाभुते. या सर्व गोष्टींचा मानवी शरीरासह संपूर्ण जीवसृष्टीवर परिणाम होतो. सर्व घटकांची निर्मिती या पाच तत्त्वांपासून होते. त्या नष्ट झाल्यानंतर यातच त्या विलीन होतात, असे मानले जात असे. यांना शुद्ध राखण्याची शिकवण आपले ग्रंथ देतात. मात्र, दुर्दैवाने याकडेही लक्ष दिले जात नाही. या पाच तत्त्वांना पाच संवेदनांशी जोडण्यात आले होते. आवाज, स्पर्श, दृष्य, चव आणि वास या त्या पाच संवेदना होत. पृथ्वीपासून पाचही संवेदना मिळत असल्याने ते सर्वात शक्तीमान तत्व मानले जाते. पाण्यापासून गंधाखेरीज अन्य चार संवेदना मिळतात. त्यामुळे ते दुसऱ्या क्रमांकाचे तत्व आहे. अग्नीपासून आपणास चव आणि गंधाची अनुभूती मिळत नाही, त्यामुळे त्याचा क्रमांक तिसरा लागतो. हवा ऐकण्यातून आणि स्पर्शातून जाणवते. अवकाशातून केवळ आवाज येतो, त्यामुळे त्याला शेवटचे स्थान देण्यात आले आहे. आज परिस्थिती इतकी भीषण झाली आहे की अवकाशातील कचऱ्याचाही विचार करण्याची वेळ आली आहे. पर्यावरण हा शब्द, परी आणि आवरण या दोन शब्दांचा मिळून बनला आहे. यातील परी म्हणजे भोवताल किंवा भवताल आणि आवरण म्हणजे वर्तुळ. आपण ज्या ठिकाणी राहतो, त्या परिघाचे हे वर्तुळ असते. आपल्या संपर्कात, सहवासात येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा समावेश पर्यावरणामध्ये



होतो. यामध्ये वनस्पती, प्राणी, माती, पाणी, हवा इत्यादी पर्यावरणाचे घटक आहेत. या सर्वांचे मिळून वातावरण बनते. पर्यावरणाला इंग्रजीमध्ये Environment म्हणतात. फ्रेंच शब्द kenvironerl म्हणजे 'शेजार' या शब्दापासून बनला आहे. यामध्ये सजीव आणि निर्जीव दोन्ही घटकांचा समावेश होतो.

पर्यावरण चांगले असणे म्हणजे सजीवाला जगण्यासाठी चांगले, पोषक वातावरण असणे. जगण्यासाठी कोणत्याही सजीवाला अन्न, पाणी आणि हवा या तीन गोष्टींची गरज असते. या खऱ्या अर्थाने मूलभूत गरजा. आपण शिकतो मात्र वेगळेच. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असल्याचे आपणास शिकवले जाते. यातील केवळ अन्न हीच मूलभूत गरज आहे. वस्त्र आणि निवारा या पूरक गरजा आहेत. अन्नाची ज्यावेळी टंचाई भासू लागली, त्यावेळी मानवाने हरित क्रांती केली आणि पुरेसे अन्न मिळेल, याची सोय केली. पाणी आपणास मोफत किंवा मातीमोल किमतीत मिळते. हवा ही आजही मोफत मिळते. त्यामुळे या दोन्ही घटकांचे आपणास महत्त्व वाटत नाही. त्यामुळे या दोन्ही घटकांचा वापर करताना कोणतीही काळजी घेतली जात नाही. एकीकडे वाढती लोकसंख्या, या वाढत्या लोकसंख्येची अन्न, निवासाची गरज भागवण्यासाठी वाढणारे कृषी क्षेत्र व अधिवासाचे क्षेत्र आणि या सर्व बाबींमुळे अन्य जीवांच्या अधिवासावर मानव अतिक्रमण करत आला. डायनासॉरसारखी प्रजाती नैसर्गिक आपत्तीमध्ये नष्ट होण्याची घटना एखादीच. त्याची आम्हाला हळहळ वाटते. मात्र, आज मानवी चुकांमुळे आणि निसर्गावरील अतिक्रमणामुळे अनेक जीवांचे पर्यावरण बिघडले आहे. त्यांना जगणे असह्य झाले आहे. त्यातून अनेक प्रजाती नष्ट होत आहेत आणि हे सर्व आपल्या निसर्गाबद्दल असलेल्या अज्ञानामुळे घडते आहे. विशेष हे की, आजही जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व मूलभूत गरजा निसर्गच भागवतो. त्यातही वनस्पतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची. वनस्पती तीनही मूलभूत गरजा भागवण्यासाठी आवश्यक अन्न, पाणी आणि हवा उपलब्ध करून देण्यासाठी कायम महत्त्वाची भूमिका बजावतात. अन्नाची गरज वनस्पती भागवतात. श्वसनासाठी आवश्यक असणारा ऑक्सिजन देतात आणि पाणी टिकवून ठेवण्याचे कार्यही वनस्पती करतात. अन्न शिजवण्यासाठी इंधन त्या पुरवतात आणि मन प्रसन्न ठेवण्यासाठी फुलेही फुलवतात. वनस्पतींवर विशेषतः झाडांवर अनेक पक्षी घरटी बांधतात. त्यावर विविध जीव आपली घरे बनवतात, पक्षी घरटी बांधतात. प्रत्येक झाड म्हणजे एक गाव असते, म्हणून झाडांचे महत्त्व मोठे.

एकूण संपूर्ण जीवसृष्टी अबाधित राहण्यासाठी पृथ्वीवरील जल, जंगल आणि जमीन यांचे संतुलन राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या तीन घटकांचे टिकून असणे परस्परांवर अवलंबून आहे. या तीनही घटकांचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. या सदरातून आपण पर्यावरणांतील विविध घटक, त्यांच्याबद्दल असणारे समज आणि गैरसमज याचा मागोवा घेणार आहोत.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

जनसंपर्क कक्ष
04 JAN 2023
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासनास जानवे यांची देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी ११ हजार रुपयांची देणगी प्रा. अशोक दिनकर जानवे यांनी भगवान महावीर अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांचेकडे सुपूर्द केली.

बिद्री दूध साखर महाविद्यालयातून ते निवृत्त झालेले प्रा. जानवे समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक तसेच प्रा. आर. बी. पाटील यांचे विद्यार्थी आहेत. या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील तसेच कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी प्रा. जानवे यांचे अभिनंदन केले आहे.

भगवान महावीर अध्यासनाच्या भव्य इमारत बांधकामास सर्व दानशूर, अहिंसाप्रेमी व्यक्ती व संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे, भगवान महावीर अध्यासन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी केले आहे. ही देणगी आयकर सवलतीस पात्र आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनास प्रा. जानवे यांची देणगी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी प्रा. अशोक जानवे यांनी ११ हजार रुपयांची देणगी अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली. प्रा. जानवे बिद्री दूध साखर महाविद्यालयातून ते निवृत्त झाले असून ते समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी अभिनंदन केले आहे.

सकाळ

# 'महावीर अध्यासनाला' देणगी

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाला प्रा. अशोक दिनकर जानवे यांनी ११ हजार रुपयांची बृहत देणगी दिली. अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्त केली.

प्रा. अशोक जानवे हे बिद्री दूध साखर महाविद्यालयातून निवृत्त झाले आहेत. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी प्रा. जानवे यांचे आभार मानले. भगवान महावीर अध्यासनाच्या इमारत बांधकामास व्यक्ती व संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.



**कोल्हापूर :** भगवान महावीर अध्यासनाला देणगी देणाऱ्या प्रा. अशोक जानवे यांना डॉ. विजय ककडे यांनी पुस्तक भेट दिले. यावेळी आर. बी. पाटील उपस्थित होते.

तरूण भारत



इचलकरंजी : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंसमवेत राहुल खंजिरे, राजन उरूणकर, प्रा. एफ. एन. पटेल, प्रा. सौरभ पाटणकर.

# शिवाजी विद्यापीठ खो-खोच्या सराव शिबिराची सांगता

प्रतिनिधी
इचलकरंजी

इचलकरंजी ही खो-खो या देशी खेळाची पंढरी म्हणून ओळखली जाते. येथे सराव करणाऱ्या खेळाडूंना खेळाची कौशल्ये प्राप्त होतात. त्याच्या जोरावर खेळाडूंनी विजयासह शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक वाढवावा, असे प्रतिपादन राहुल खंजिरे यांनी केले.

येथील नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्सच्या वतीने आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ खो-खो संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंच्या शिबिर सांगताप्रसंगी ते बोलत होते. हा संघ बसवाडा विद्यापीठ, राजस्थान येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

सराव शिबिर दहा दिवस जयहिंद क्रीडा मंडळाच्या मैदानावर उत्साहात पार पडले. यावेळी खेळाडूंना शुभेच्छा देण्यासाठी कोल्हापूर जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष राजन उरूणकर उपस्थित होते.

शिबिरामध्ये सांगली, कोल्हापूर, सातारामधील २० खेळाडू सहभागी झाले होते. खेळाडूंना राष्ट्रीय खेळाडू अमित नवाळे, प्रा. अमित कागले, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. देवेंद्र बिरनाळे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अक्षय सोनटक्के, डॉ. माधव मुंडकर, डॉ रामेश्वर सपकाळ आदी उपस्थित होते.